महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जून २००७

आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००७/प्र.क्र.-१९६(२)/म-१.---मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत काढलेले आधीचे सर्व आदेश, अधिसूचना किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली असल्याने, ते याद्वारे, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक पीएसआय-१७०७/(सीआर-५०)/आयएनडी-८, दिनांक ३० मार्च २००७ यानुसार सुरू केलेल्या सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ अंतर्गत गट अ आणि गट ब असे वर्गीकरण केलेल्या क्षेत्रात, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक आयडीएल-१००५/(सी.आर.११९)/उद्योग-८, दिनांक २ जून २००५ अन्वये निश्चित केलेला व मान्यता दिलेला एक नवीन "विशाल प्रकल्प" सरू करण्याच्या संबंधात निष्पादित केलेल्या जमीन हस्तांतरणाच्या पहिल्या संलेखावर, उक्त अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची एक मधील अनुच्छेद २५ अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क, १ एप्रिल २००७ रोजी सुरू होणाऱ्या व ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी पुढील शर्तीवर ५० टक्क्यांपर्यंत कमी करीत आहे :--

**शर्त क्रमांक १.**--मंजूर केलेली मुद्रांक शुल्कातील घट ही, नेहमी, शासकीय परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक-२००५/३३५९/सीआर ५९५/एम-१, दिनांक १ ऑगस्ट २००६ अन्वये निर्धारित केलेल्या शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन असेल.

**क्रमांक २.**--ज्या कामांसाठी माफी देण्यात आलेली आहे ती कामे सुरू करण्यात कसूर करणारे किंवा सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ याच्या कोणत्याही शर्तीचा भंग करणारे कोणतेही युनिट, जणू काही सुरुवातीपासूनच मुद्रांक शुल्कात घट करण्यात आली नसल्याप्रमाणे, मुद्रांक शुल्क व दंड भरण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**--या आदेशाच्या प्रयोजनासाठी "विशाल प्रकल्प" याचा अर्थ, सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ याच्या खंड २ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अंमलबजावणी अभिकरणाने किंवा या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने असे युनिट म्हणून प्रमाणित केलेल्या विशाल प्रकल्पाच्या विकासाशी संबंधित असलेले युनिट, असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. रा. माळी,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 12th June 2007

### Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. Mudrank. 2007/C.R. 196(2)/M-1.—In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), and in supersession of all the previous orders, notifications or instruments issued in this behalf, the Government of Maharashtra, being satisfied that, it is necessary to do so in public interest, hereby reduces upto 50 per cent., the stamp duty chargeable under article 25 in Schedule I apended to the said Act, on the instrument of first conveyance of land executed in relation to the starting of a new "Mega Project " as defined and approved under the Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. IDL. 1005/(C.R. 119)/Industry-8, dated the 2nd June 2005, in the Group A and Group B areas classified as such area under the Package Scheme of Incentives, 2007 introduced under Government Resolution, Industries, Energy and Labour Department No. PSI-1707/(CR-50)/IND-8, dated 30th March 2007 for the period commencing from 1st April 2007 and ending on the 31st March 2011 subject to conditions given below :—

*Condition No. 1.*—The reduction in stamp duty granted shall always be subject to the fulfilment of the conditions laid down by the Government circular, Revenue and Forests Department, No. Mudrank. 2005/3359/CR. 595/M-1, dated the 1st August 2006.

*No. 2.*—Any unit failing to start the activities for which the reduction in stamp duty is granted or commits breach of any of the conditions of the Package Scheme of Incentives, 2007, shall be liable to pay the stamp duty and penalty, as if, there was no reduction in stamp duty from the beginning.

*Explanation.*—For the purpose of this order, " Mega Project " means an unit concerned with development of Mega Project, which is so certified to be such unit by the Inplementing Agency, specified under clause 2 of the Package Scheme of Incentives, 2007 or any other officer authorised by it in this behalf.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. R. MALI,
Joint Secretary to Government.